सोमवार
दि.०३ एप्रिल २०२३
मुल्य २ /- रूपये
पृष्ठ ४
वर्ष ६ वे अंक १५

Postal Reg. No : G2/47/CHA-304/2022-23

मराठी साप्ताहिक

सह्याद्रीचा राखणदार

www.sahyandrinews.com
RNI. MAHMAR/2018/77866
संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे

Scan QR code
to visit ...
Epaper Portal

पर्यटकांवर मधमाशांनी केला हल्ला
दोन जण ठार, पाच जखमी

नागभीड तालुक्यातील घटना

चंद्रपूर / प्रतिनिधी
जिल्ह्यातील तळोधी बाळापूर वनपरिक्षण केंद्र आणि तळोधी पोलीस ठाण्याअंतर्गत येणाऱ्या गोविंदपूर परिसरातील पेरजागड (सेव्हनसिस्टर्स हिल) या टेकडीवर पर्यटनासाठी आलेल्या नागपूरच्या पर्यटकांवर मधमाशांनी हल्ला केला. त्यामुळे २ जणांचा मृत्यू झाला असून ५ जण गंभीर जखमी झाले आहेत. त्यामध्ये काही महिला आणि सहा ६ महिन्यांची चिमुरडी आहे, जखमींची नावे कळू शकलेली नाहीत. तर नागपूरचे रहिवासी अशोक विभीषण मेंढे (६२) यांचा जागीच मृत्यू झाला. तर गुलाबराव पोचे (५८) यांना

- दोघांचेही मृतदेह नागभीड ग्रामीण रुग्णालयात शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आले. रात्री ११ वाजेपर्यंत हा कार्यक्रम सुरू होता. पुढील तपास तळोधी पोलीस व तळोधी वनविभाग करीत आहेत.

डोंगर संकुलातून गंभीर अवस्थेत वाचवताना वाटेतच मृत्यू झाला.
ही घटना शनिवारी दुपारी २:०० वाजताच्या सुमारास घडली असण्याची शक्यता आहे.
सायंकाळी वनविभागाला याची माहिती मिळताच तात्काळ घटनास्थळी वनविभागाच्या टीम अग्निशमन दलाच्या दोन गाड्या तळोधी, नागभीड पोलीस व स्वाब नेचर केअर संस्थेचे पदाधिकारी व सदस्य घटनास्थळी पोहोचले व बेपत्ता गुलाबराव पोचे यांचा शोध घेण्यास सुरुवात केली, नंतर त्यांना अत्यवस्थ अवस्थेत शोधून डोंगरावरून खाली रुग्णवाहिकेत नेले असता वाटेतच त्यांचा मृत्यू झाला. तर वरील डोंगरावर मधमाशांच्या दंशामुळे अशोक मेंढे यांचा मृत्यू झाला होता.

अवैध गोवंश तस्करीवर पोलिसांची कारवाई

चंद्रपूर / प्रतिनिधी
शेतीप्रधान सावली तालुक्यात मोठ्या प्रमाणात गोवंश पाळले जातात, त्याचा उपयोग शेती कामासाठी केल्या जातो,विपुल प्रमाणात असलेल्या गोवंशाचा फायदा घेऊन तालुका, जिल्हा सह परप्रांतीय तस्कर सक्रीय झाले असून मोठ्या प्रमाणात या भागातील गोवंश परप्रांतात विकले जात आहेत, आतापर्यंत अशा एकुण गोवंश तस्करी करणाऱ्या १५ तस्करावर कारवाई करण्यात आली.
या कारवाईमुळे गोवंश तस्करी करणाऱ्या चे धाबे दणाणले आहे.
अवैध गोवंश जनावरे वाहतुकीबाबत मिळालेल्या गुप्त माहिती नुसार ८ एप्रिल २०२३ रोजी रात्री १ वाजताचे सुमारास मुल दिशेकडून गोंडपिंपरी कडे जाणाऱ्या मार्गावर खेडी फाटा येथे नाकाबंदी करून मुल कडून येणाऱ्या कंटेनर आयशर ट्रक क्रं टीएस १२ युडी २७८० थांबवले असता चालक पोलिसांना पाहून वाहन सोडून पळून गेला. सदर ट्रक कंटेनर पाहणी केली असता कंटेनरमध्ये एकूण ३६ गोवंश जातीचे जनावरे अत्यंत निर्दयतेने बांधलेल्या अवस्थेत दिसून आले. मिळून आलेले एकूण ३६ गोवंश जनावरे कींमत ३ लाख ६० हजार रु व नमूद क्रमांकाचा आयशर ट्रक की. अं. १० लाख रू असा एकूण किं १३ लाख ६० हजार रु चा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

> शेतकऱ्यांच्या दैवताला सर्रासपणे कत्तल करणे योग्य नाही, आतापर्यंत याची गंभीर दखल घेत गोवंश तरस्करावर समुळ आळा घालण्यासाठी प्रयत्न केला जात आहे..
> **आशिष बोरकर (ठाणेदार)**
> **पो. स्टेशन सावली.**

अवैध रेती तस्करी करणाऱ्यांवर कारवाई केल्याने तस्कराचे धाबे दणाणले

चंद्रपूर / प्रतिनिधी
नागभीड जवळील तळोधी बाळापुर येथील पी. एस. आय. आकाश साखरे यांनी तळोधी बा. पोलीस स्टेशन हद्दीतील परिसरात होत असलेल्या अवैध धंद्यांना आळा बसेल यासाठी धाडसत्र सुरु केले आहे.
अशातच रात्रौ च्या वेळी ग्रस्त घालून सावरगाव वाढोणा मुख्य रोड व जिवनापुर परिसरात रात्रीच्या वेळेस रेती वाहतूक करताना ट्रॅक्टर दिसुन आला सदर चा ट्रॅक्टर-ट्राली ची वाहन चालकाची झडती घेतली असता विना परवान्या ची अवैध रेती वाहना मध्ये मिळून आल्याने अवैध वाहतूक करणारा ट्रक्टर पोलीस ठाण्यात आणण्यात आले.
सदरच्या रेती तस्करावर कलम — ३७९,भा.द.वि. नुसार गुन्हा नोंद करून तपासात घेतला आहे. ही कारवाई पी. एस. आय. साखरे यांचा आदेशान्वये नेवारे, भानाकर यांनी केली आहे. तसेच या परिसरात मोठ्या प्रमाणात अवैध वाळू तस्करी व अनेक अवैध धंदे वाढले असून पी. एस. आय. साखरे यांनी धाड सत्र सुरू केल्याने परीसरातील रेती तस्करी व अवैध धंदे करणाऱ्यांचे चांगलेच धाबे दणाणले आहे.

आयपीएल क्रिकेट सट्टेबाजांवर पोलिसांची कारवाई

चंद्रपूर / प्रतिनिधी
सध्या सुरू असलेल्या आयपीएल क्रिकेट सामन्यांवर चंद्रपूर जिल्ह्यात मोठया प्रमाणात सट्टा लावण्यात येत आहे. क्रिकेटचे बुकी अवैधरित्या हा व्यवसाय चालवित आहेत मात्र या प्रकारावर आळा घालण्यासाठी चंद्रपूरचे जिल्हा पोलिस अधीक्षकांनी विशेष मोहीम हाती घेतली आहे.
स्थानिक गुन्हे शाखेतील अधिकारी , कर्मचारी यांचे वेगवेगळे पथक तयार करून त्यांना कारवाई करण्याचे आदेश पोलिस अधीक्षकांनी दिले. त्यानुसार पोलिस स्टेशन पडोली हद्दीतील यशवंतनगर येथे एमएच-३४ पानठेला येथे येथे जुगल हिरालाल लोया हा इंडियन प्रिमीयर लीग (आयपिएल -२०२३) सनराईज हैद्राबाद विरूध्द लखनौ सुपर जायटस क्रिकेट या आयपिएल क्रिकेटच्या मॅचवर पैशाची बाजी लावुन जुगार खेळत असतांना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने धाड टाकली. सदर ठिकाणी सदर इसम मोबाईलवर संभाषण व मेसेज करून व कागदावर आकडे लिहून आयपिएल क्रिकेट सटटा चालवितांना दिसून आला. त्याला ताब्यात घेवुन त्यांचे कडुन मोबाईल, नगदी रक्कम, जुगाराचे ईतर साहीत्य असा एकुण १२ हजाराचा माल जप्त करण्यात आला.
या प्रकरणात आरोपी जुगल हिरालाल लोया (४८) रा. यशवंत नगर हनुमान मंदिरजवळ पडोली आणि आरोपी पारस उडाक रा. चंद्रपुर या दोघांविरूध्द गुन्हा नोंद करण्यात आला तर दुसऱ्या घटनेत रयतवारी कॉलरी चंद्रपुर येथील सि.आर.सि ग्राउन्डचे गेट समोर सिध्दार्थ राजकुमार कुरमी हा इंडियन प्रिमीयर लीग (आयपिएल -२०२३) सनराईज हैद्राबाद विरूध्द लखनौ सुपर जायटस क्रिकेट या आयपिएल क्रिकेटच्या मॅचवर पैशाची बाजी लावुन जुगार खेळत असल्याची गोपनिय माहिती मिळताच स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाने धाड टाकून त्यांचे कडुन मोबाईल, नगदी रक्कम, जुगाराचे ईतर साहीत्य असा एकुण १७ हजार ८१० रू. चा माल जप्त करण्यात आला असून सटटेबाज नामे सिध्दार्थ राजकुमार कुरमी वय २५ वर्ष रा. रयतवारी कॉलरी बि.एम.टि.चौक चंद्रपुर यांचे विरूदध पो. स्टे रामनगर येथे गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पो.स्टे रामनगर करित आहे.

- चंद्रपूर जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर आयपीएल क्रीकेट मॅचवर सट्टा बाजार चालविला जात आहे मात्र या अवैध व्यवसायातील बडे मासे अद्यापही खुलेआम फिरत आहेत. जिल्हाभरात सुरू असलेल्या या क्रिकेट सट्टा चालविणाऱ्यांचे नेटवर्क आता पोलिस प्रशासन मोडणार की लहान सहान कारवाया करून स्वताची पाठ थोपटून घेते याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

बिबट्याच्या हल्ल्यात आयुध निर्माणीतील कामगार जखमी

भद्रावती / प्रतिनिधी
ऑर्डनन्स फॅक्टरी कॉलनीतील अयप्पा मंदिराजवळ बिबट्याने आयुध निर्माणीतील कर्मचाऱ्यावर हल्ला करून जखमी केले. ही घटना ८ एप्रिल रोजी सायंकाळी ६.३० वाजता घडली.

रमेशकुमार गुप्ता (३७, रा. वॉर्ड क्रमांक ड-टाइप ते सेक्टर ४ ऑर्डनन्स फॅक्टरी कॉलनी) असे जखमी व्यक्तीचे नाव आहे. नेहमीप्रमाणे फिरायला गेलो. त्याला वाचवण्यासाठी गेलेली एक व्यक्ती खाली पडली आणि त्याचा हात फ्रॅक्चर झाला. ७ एप्रिल रोजी सेक्टर ४ येथील रेडी नावाच्या व्यक्तीच्या घरात घुसून याच बिबट्याने त्याच्या पाळीव कुत्र्यालाही पळवून नेले. या घटनेची माहिती मिळताच वनविभागाचे वनविभागाचे अधिकारी एच.पी.सेंड अ क्षेत्र सहाय्यक विकास शिंदे वनरक्षक यांनी तेथे जाऊन पंचनामा केला.

वाघाच्या हल्ल्यात तीन म्हशी ठार

चंद्रपूर / प्रतिनिधी
ब्रह्मपुरी वन विभागांतर्गत येत असलेल्या तळोधी बा. वन परिक्षेत्रातील सावंगी गावालगत असलेल्या शेतशिवारात चराई करीत असलेल्या म्हशींवर वाघाने हल्ला केला. यात तीन म्हशींचा मृत्यू झाला, तर तीन म्हशी गंभीर जखमी झाल्या. सोमवारी सायंकाळी घडलेल्या या घटनेमुळे नागरिकांमध्ये दहशत निर्माण झाली आहे. नागभीड तालुक्यातील सावंगी (बु.) येथील सुरेश खोब्रागडे यांच्या तीन म्हशी व रवी वाटगुरे यांच्या तीन म्हशी सावंगी शेतशिवारात चरत असताना सोमवारी सायंकाळदरम्यान दबा धरून बसलेल्या पट्टेदार वाघाने हल्ला करून तीन म्हशींना ठार केले, तर तीन म्हशींना जखमी केले. तळोधी बा. वन विभागाला माहिती देऊन पंचनामा करण्यात आला आहे. म्हैस मालकांना वन विभागाने तत्काळ आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी होत आहे.

जुगार खेळताना वन अधिकाऱ्याच्या वाहन चालकासह दोन कर्मचाऱ्यांना अटक

दुर्गापूर पोलिसांची कारवाई

चंद्रपूर / प्रतिनिधी
ताडोबा - अंधारी व्याघ्रप्रकल्पातील उपविभागीय वनाधिकारी यांचा चालकासह वनविभागाच्या दोन कर्मचाऱ्यांना जुगार खेळताना रंगेहाथ अटक करण्यात आली. चालकाचे नाव राकेश चौधरी तर आशिष डहाके, संतोष चौधरी अशी अन्य कर्मचाऱ्यांची नावे आहेत. यासोबतच आणखी दोन जणांना अटक करण्यात आली आहे. ही कारवाई दुर्गापूर पोलीस ठाण्याअंतर्गत तुकुम परिसरात करण्यात आली. मात्र वनविभागाची बदनामी होऊ नये याबाबत पोलीस विभाग कमालीची गुप्तता पाळत आहेत.
५ पाच जणांना जुगार खेळताना रंगेहाथ अटक केले असून राकेश चौधरी हा ताडोबा-अंधारी व्याघ्रप्रकल्प (बफर) उपविभागीय वनाधिकारी कुशाग्र पाठक यांचा चालक आहे. त्याला जुगार खेळण्याचा शौक आहे. त्यामुळे इतर वन कर्मचाऱ्यांना घेऊन तो नेहमी जुगार खेळत असतो. ४ एप्रिलला नेहमी प्रमाणे तो तुकुम येथील मोगरे नावाचा व्यक्तीच्या घरी जुगार सुरू होता. याबाबतची गुप्त माहिती दुर्गापूर पोलिसांना मिळाली. यावेळी डीबी पथकाचे पोलीस कर्मचारी सुनील गौरकार त्यांच्या चमूने थेट या ठिकाणी धाड टाकली. यावेळी पाच जणांना जुगार खेळताना रंगेहाथ अटक करण्यात आली. यात तीन जण हे वनविभागात कार्यरत आहेत. यामध्ये ताडोबा-अंधारी व्याघ्रप्रकल्प (बफर) उपविभागीय वनाधिकारी पाठक यांचा चालक राकेश चौधरी, लिपिक आशिष डहाके, संतोष चौधरी यांचा समावेश आहे.

वन, सांस्कृतिक कार्य व मत्स्य व्यवसाय मंत्री सुधीर मुनगंटीवार यांचे प्रतिपादन

भाजपचा प्रत्येक कार्यकर्ता भारतमातेचा सुपूत्र

सत्कारमुर्ती मा. श्री.

चंद्रपूर/ प्रतिनिधी
इतर पक्षांमध्ये नेत्यांचा परिवार हाच पक्ष मानला जातो आणि त्या पक्षाचा नेताच पक्षाचा ब्रँड ॲम्बेसेडर असतो. मात्र भारतीय जनता पार्टीसाठी कार्यकर्ता हाच खरा ब्रँड ॲम्बेसेडर आहे. आणि प्रत्येक कार्यकर्ता हा भारतमातेचा सुपूत्र आहे, असे प्रतिपादन राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्य व्यवसाय मंत्री तसेच चंद्रपूरचे पालकमंत्री ना. सुधीर मुनगंटीवार यांनी केले. बामणी येथे पक्ष प्रवेशाचा कार्यक्रम शुक्रवारी आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी ते बोलत होते.
कार्यक्रमाला ज्येष्ठ नेते चंदनसिंह चंदेल, भाजपचे जिल्हाध्यक्ष देवराव भोंगळे, बल्लारपूरचे तालुकाध्यक्ष किशोर पंदीलवार, माजी जिल्हा परिषद सदस्य डॉ. हरीश गेडाम, माजी पंचायत समिती उपसभापती गोविंदा पोडे, लावारीचे सरपंच पोतराजे, ग्रामपंचायत सदस्य गणपत मोरे, नीलेश खरबडे यांची प्रमुख उपस्थिती होती. ना.मुनगंटीवार म्हणाले, 'ज्या कार्यकर्त्यांनी भाजपामध्ये प्रवेश केला त्यांचा एखाद्या पक्षात नव्हे तर, भारतीय जनता पार्टी नावाच्या परिवारात प्रवेश झालेला आहे. भाजपमध्ये कोणत्याही जातीभेदाला थारा नाही.
कार्यकर्त्यांच्या जोरावर चालणारा हा पक्ष आहे.' 'भारतीय जनता पार्टीचा झेंडा हा राष्ट्रभक्तीचा झेंडा आहे. हा झेंडा हाती घेणाऱ्याला आयुष्यात आनंद आणि समाधान दोन्ही प्राप्त होतं. भाजपाला कधी काळी हिणवले जायचे. परंतु विश्वगौरव, देशगौरव पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांनी पक्षाची ओळखच बदलून टाकली आहे,' असे ना. मुनगंटीवार यांनी अभिमानाने नमूद केले. ब्रिटनचे माजी पंतप्रधान टोनी ब्लेअर यांनीही मोदीजीकडे पाहुन त्यांच्यात जगाचे नेतृत्व करण्याची क्षमता असल्याचे म्हटले होते, याचाही त्यांनी आवर्जून उल्लेख केला.

विरोधकांना चिंतेचे कारण नाही

- निराधारांना मिळणारे अनुदान सर्वप्रथम आपण वाढवले. त्यानंतर आता त्यात आणखी वाढ केली आहे. अंगणवाडी सेविका, मदतनिसांच्या मानधनातही भरघोस वाढ करण्यात आली आहे, याचा उल्लेख करत विरोधकांनी चिंता करण्याचे कारण नाही, कारण हे सर्वसामान्यांचे सरकार आहे, असा टोलाही ना. मुनगंटीवार यांनी लगावला. सर्वसामान्यांशी गद्दारी करून महाविकास आघाडी सत्तेवर आली. पण त्यांच्या कार्यकाळात कोणतीही कामे झाली नाही. पण आता चित्र पूर्णपणे पालटले आहे. आता विकासाचा शून्य नको असेल तर सर्वांनी विश्वगौरव, देश गौरव नरेंद्र मोदी यांचे हात बळकट करावे, असे आवाहन ना.मुनगंटीवार यांनी केले.

अर्थसंकल्प गरिबांचा, शेतकऱ्यांचा

- 'केंद्र आणि राज्याचा अर्थसंकल्प सामान्यांना डोळ्यापुढे ठेवून तयार करण्यात आला आहे. शेतकऱ्यांच्या खात्यात आता थेट १२ हजार रुपये जमा होणार आहेत. कोट्यवधी लोकांना सुमारे २८ महिने मोफत धान्य देण्यात आले. गरिबांवर उपाशी झोपण्याची वेळ येऊ नये हाच हेतू आहे,' या शब्दांत ना. मुनगंटीवार यांनी अर्थसंकल्पाचे कौतुक केले. 'राज्य सरकारने एक रुपयात पीकविमा देण्याचा निर्णय केला आहे. आपण अर्थमंत्री असताना संकटग्रस्त शेतकऱ्यांना सानुग्रह अनुदान देण्याची घोषणा केली होती. या अनुदानात आता शेतकऱ्यांच्या कुटुंबांचाही समावेश करण्यात आला आहे. इतकेच नव्हे तर त्यांना आता विनाविलंब मदतही मिळणार आहे,' असे ना .मुनगंटीवार यांनी नमूद केले.

फ्लाईंग स्कॉडची धडाकेबाज कारवाई

अवैध रेतीवाहतुक करणाऱ्या दोन हायवा जप्त

संग्रहीत छायाचित्र...

गोंडपिपरी / प्रतिनिधी
जिल्ह्यात होत असलेल्या गौण खनिज तस्करी बद्दल जिल्हाधिकाऱ्यांनी संपूर्ण उपविभागीय अधिकारी व तहसीलदार यांना खडे बोल सुनावले.जिल्हाधिकारी विनय यांच्या सुचनेनंतर कर्तव्यदक्ष गोंडपिपरीचे उपविभागीय अधिकारी संजयकुमार ढवळे ?क्टिव्ह होऊन धडाकेबाज कारवाया करत आहे.
दि.(८) शनीवारी रात्री दोन च्या दरम्यान रेती वाहतूक करणाऱ्या वाहनांची तपासणी करत असताना नूर मोहम्मद यांच्या मालकीचे शप ३४ ँउ ८३८६ व आमिर खान यांच्या मालकीचे शप ३४ ँ४९९६ क्रमांकाचा हायवा महाखनिक ऑनलाईन प्रणालीवर तपासला असता जिल्ह्यातून बाहेर पडण्यासाठी ४ तासापेक्षा जास्त घेतले त्यामुळे ऑनलाईन प्रणालीवर अवैद्य दाखवल्यामुळे जप्त करण्यात आला.यावेळी कारवाई दरम्यान फ्लाईंग स्कॉड मध्ये नायब तहसीलदार अविनाश शेंबटवाड, तलाठी सुरज राठोड,पोलीस पाटील जांकिराम झाडे, साईनाथ धुडसे,पोलीस कर्मचारी प्रशांत नैताम,कोतवाल गेडाम,राहुल भोयर उपस्थित होते.उपविभागीय अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनात महिन्याभरात अनेक हायवा,ट्रॅक्टर,पोकलँड वर कारवाया केल्याने रेती तस्करांचे धाबे दणाणले आहे.

महसूल विभागाचा मास्टरप्लान

- उपविभागीय अधिकाऱ्यांनी रेती तस्करी रोखण्यासाठी महसूल पथकाची नेमणूक केली दरम्यान २४ तास हे पथक कार्यान्वित राहणार आहे.या पथकात तलाठी कोतवाल दोन पोलीस कर्मचारी,पोलीस पाटलासह एका अधिकाऱ्याचा सुद्धा समावेश राहणार आहे दररोज हे फिरते पथक तीन शिफ्टवर काम करणार आहे.पथकाला कार्यवाहीसाठी मदत व्हावी म्हणून ज्या प्रकारे पोलीस विभागाकडून नागरिकांसाठी १०० क्रमांक जारी करण्यात आला त्याच धर्तीवर येतील अधिकाऱ्यांनी जनतेसाठी ९०९६७३५९ ३६ हा क्रमांक ठेवला आहे या क्रमांकावर केवळ गौण खनिजाच्या कार्यवाही संदर्भातच तक्रारी स्वीकारल्या जातील असे आव्हान जाहीर करण्यात आले.

आयुष्य कसं जगायचं ठरवूया!

आपलं आयुष्य म्हणजे कायष्ठ एक सुखाचं गाणंष्ठ प्रत्येकजण स्वतःच्याच सुखासाठी जगत असतो. फक्त माणसांगणिक सुखाची व्याख्या बदलत असते इतकंच. कोणी आत्मिक सुख महत्त्वाचं मानतो, तर कोणी भौतिक सुखासाठी धडपडत राहतो. पण सगळ्यांनाच दुःखात नक्कीच राहायचं नसतं.

पण मग नक्की योग्य काय आत्मिक सुख की भौतिक सुख. अर्थातच ज्यात आपला आत्मा, आपलं मन सुखी समाधानी असेल ते खरं सुख म्हणावं लागेल. जे काही आहे ते सगळं आपल्याच मानाच्या ताब्यात आहे. फक्त गरज आहे ती मनाला योग्य विचारांचे वळण देण्याची. जर कुणाला आत्मिक सुखात समाधान असेल, पण त्याच्याप्रमाणे घरातले विचार करत नसातील, तर त्याचं आयुष्य नक्कीच अशांत राहणार आणि एखाद्याला घरात टीव्ही, फ्रिज महागाडी गाडी दागिने यातून मानसिक सुख मिळत असेल, तर त्याला चॅलेंज कसं करायचं? पण या गोष्टी मिळवताना तो माणूस जर चुकीच्या स्पर्धेत किंवा मार्गांवरून जातं असेल, तर तो ताणातून जात असणार, हेही तितकंच सत्य आहे.

हा विषय मांडण्याचं कारण म्हणजे अकाली होतं असलेले मृत्यू! आजूबाजूला बघितलं तरी लक्षात येतं की, अगदी लहानपणापासून बघितलेल्या तरुणाचे अकाली निधन झालंय, कुणाचा नवरा, कुणाचा पिता, मुलगा भाऊ अकालीच निघून गेलाय. त्यातही हृदयरोग आणि त्यातही कार्डियाक अरेस्टने तरुण मुलं, मुली अवघ्या पस्तीस-चाळीशीतच आपला जीव गमावून बसली आहेत.

या वयात खरं तर आयुष्य नवं वळण घेत असतं. नोकरीच, व्यवसायात सिद्ध होण्याची धडपड, माणसारखी किंवा मनासारखा जोडीदार मिळण्याची धाकधूक, संसार, मुलं यांची जबाबदारी आल्यावर ती समजून थोडं चुकून त्यातून शिकून स्थिरस्तावर झालेले हे वय. आपल्याच आयुष्याच्या भूतकाळाकडे आणि भविष्याकाळाकडे डोळे विसफारून बघण्याचे वय. आयुष्य नक्की कसं आहे? हे समजून घेण्याचं वय. याचं वळणावर अनेक तरुण आपला जीव कर्डियाक अरेस्ट नावाच्या काही सेकंदात होत्याच नव्हतं करून टाकणाऱ्या हृदयरोगाने त्याचं आणि त्याच्या कुटुंबाचं आयुष्य उद्ध्वस्त करून टाकतो आहे.

यावर अनेक मुद्द्यांनी ऊहापोह होऊ शकतो. पण यात खरा मुद्दा आहे तो आपल्याच प्रकृतीला गॅरेन्टेड धरत सुख या खरी व्याख्याच न समजलेल्या गोष्टीच्या मागे न थांबता धावणे होय. हल्ली लवकर सेटल व्हायचं असतं, ते होतही येतं. पण त्यासोबत अस्वस्थता, गमावून बसण्याची भीती, सत्तेत असाल, तर पराजायची भीती, टिकून राहण्याचा अट्टहास, त्यासाठी केलेले अनेक ॲडजस्टमेंट, कुटुंब सुखापासून झालेली फारकत, कामं, आजूबाजूच्या वातावरणातून येणाऱ्या तणावावर उपचार असतात, त्या कुटुंबाला सुखामध्ये पण वेळ नसतो. आई-बाबांच्या, पत्नीच्या, मुलांच्या सोबत क्षण घालव्याला वेळ नसतो, आतातर नाते संबंधातसुद्धा व्यवहार आले आहेत. एक व्यवहार म्हणून अनेकदा नाते बांधले जाते आणि मग सुखाचे वेगळे मार्ग शोधले जातात. माणूस आर्थिकदृष्ट्या सक्षम होतो. पण मनाला समाधानी करण्यात अपयशी झाला, तर तो बेचैन होतो आणि त्या सगळ्याचा ताण त्याच्या हृदयावर येतो हे साहजिक लक्षण आहे आणि सगळं भयंकर आहे.

भारतीय संस्कृतीत कुटुंब व्यवस्थेला खूप मोठं महत्त्व आहे. कुटुंब भक्कम पाठीशी असेल, तर जग जिंकता येतं याची अनेक उदाहरणे आहेत.

सुख म्हणजे काय, समाधान म्हणजे नेमकं काय, भौतिक सुखासाठी, स्पर्धेसाठी किती धावायचे? याचेही काही प्रमाण आहे. आपल्याला आपल्या आयुष्यात शेवटी काय हवे आहे, हे एकदा निश्चित झाले, तर आयुष जगणं सोपं जातं. मात्र विचार होणे अवशयक आहे. यावर अगदी सोपा मार्ग मेडिटेशन आहे. त्यातून आपलंच मन आपल्याला समजू लागतं, त्याला नेमकं काय हवयं हे समजत. आयुष्याचा नेमका मार्ग सापडतो आणि मग जगणं ताणविरहित होऊन जातं.

शैक्षणिक संस्थांचा हेतू असावा शुद्ध!

राज्यात ८०० शाळा बोगस निघतील वा असतील असा विचार कुणीही केलेला नसेल. शासनाची कोणतीही परवानगी न घेता शाळा सुरू करणे हा मोठाच अपराध आहे. यावरूनच शासनाची, विद्यार्थी आणि त्यांच्या पालकांची किती मोठी फसवणूक होत आहे हे यावरून स्पष्ट होते. वास्तविक या शाळांच्या अध्यक्ष व संचालकांचा नेमका शाळा सुरू करण्यामागे काय दृष्टिकोन आहे, हे त्यांची चौकशी केल्यानंतरच स्पष्ट होईल. आज-काल शाळा सुरू करून पैसा कमविणे हा धंदा बनला आहे. तर काहीजण एका सामाजिक आणि शैक्षणिक ध्येयापोटी अशा संस्था सुरू करतात. खरे म्हणजे शिक्षणाची चालणारी ही अखंड प्रक्रिया आहे.

ती गतिमान करणे हे केवळ शासनाचेच काम नाही, तर प्रत्येकाने त्यासाठी खारीचा वाटा उचलला पाहिजे. तरच 'शहाणे करून सोडावे सकलजना' असे म्हणता येईल. म्हणूनच कर्मवीर भाऊराव पाटील यांनी रयत शिक्षण संस्थेची स्थापना केली होती. स्वतः महात्मा जोतिबा फुले यांनी त्या काळात गोरगरीब, रंजलेगांजले, उपेक्षित अशा समाजातील मुलांसाठी शाळा सुरू केली होती. सावित्रीबाई फुले यांनी तर स्वतः किती कष्ट घेतले आहेत, हे सर्वांना ज्ञात आहे. शिक्षण म्हणजे अमृत, शिक्षण म्हणजे तिसरा डोळा, शिक्षण म्हणजे वाघिणीचे दूध, एक शक्ती आहे. हाच विचार या महापुरुषांनी केला म्हणून आज सुसंस्कृत पिढ्या घडत आहेत. शिक्षणाची सोय नसती तर केवढा मोठा अनर्थ घडला असता, असे शिक्षणाचे महत्त्व महात्मा फुले यांनी विशद केले आहे. केवढा मोठा त्यांचा विचार, दूरदृष्टी होती याची कल्पना आल्याशिवाय राहत नाही. या शिक्षणामुळेच तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर घडले. शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही, याची जाणीव जेव्हा त्यांना झाली, तेव्हापासून त्यांनी एक क्षणही वाया घालवला नाही म्हणूनच तर त्यांनी भारतासह विदेशात उच्चशिक्षण घेतले. त्याचा फायदा त्यांनी त्यांच्या कुटुंबासाठी नाही तर समाजासाठी करून दिला. एवढे शिक्षणाचे महत्त्व आहे.

शिक्षणावाचून कुणी अलिप्त राहता कामा नये, असे शासनाचे धोरण आहे. पण, या धोरणाचा विचार सोडून आज अनेकांनी शिक्षणाचा बाजार मांडला आहे. आज ज्या शिक्षण संस्थांनी उत्तमप्रकारे शाळा चालवल्या, त्या शाळा शंभर टक्के अनुदानावर चालवल्या जातात. तर काही विनाअनुदान तत्त्वावर चालवल्या जातात. इंग्रजी माध्यमाच्या बहुतांश विनाअनुदान किंवा काही प्रमाणात अनुदान मिळतही असेल. अशा खासगी आणि तेही इंग्रजी माध्यमाच्या शाळांत शिकणारी मुले ही उच्च कुटुंबातील असतात. त्यामुळे वाटेल तशी फी देऊ शकतात; परंतु मध्यमवर्गीय, गरिबी कुटुंबातील मुला-मुलींना अनुदानीत शाळांमधूनच शिकावे लागते. त्यामुळे त्यांचे शुल्क परवडणारे असते. पण ज्यांनी धंदाच उघडला ते कोणत्याही पद्धतीने पालकांकडून पैसा काढत असतात. अशा शाळांना सावध राहण्याची गरज आहे. आजही अनेकजण एका ध्येयापोटी शाळा चालवतात. मग त्यासाठी शासनाच्या अनुदानाची ते वाट पाहत नाहीत व फिकीर करीत नाहीत. पण असा विचार करणारे बोटावर मोजण्यासारखे सापडतात. शाळा सुरू करून विद्यार्थ्यांकडून भरमसाट फी वसूल करणे, डोनेशनची मागणी करणे व या ना त्या कारणावरून विद्यार्थी व त्यांच्या पालकांकडून पैसे उकळणे असे प्रकार चालवले आहेत. राज्यभरात कुठेही शाळा सुरू करावयाची असल्यास शासनाच्या शिक्षण विभागाची रितसर परवानगी घ्यावी लागते. महानगरपालिका किंवा नगर परिषद हद्दीत शाळा सुरू करावयाची असल्यास त्या संस्था आपल्या हद्दीत शाळा सुरू करतात. पण या संस्थांचीही परवानगी घ्यायची नाही आणि शासनाचीही परवानगी घ्यायची नाही, मग अशा शाळा बोगस म्हणणार नाही तर काय? राज्यात अशा ८०० बोगस शाळा असल्याचे आढळून आले आहे. त्यापैकी पुण्यातील ४३ शाळांचा त्यात समावेश आहे. मुंबईत सायन, वडाळा आणि माटुंगा या भागात अशा बेकायदेशीर शाळा आढळून आल्या आहेत. मुंबईतील या शाळांवर महानगरपालिका काय कारवाई करते, हे बघावे लागेल. राज्यात एकूण १३०० शाळांची पडताळणी करण्यात आली होती.

शिक्षण विभागाच्या या पडताळणीत आठसे शाळांमध्ये त्रुटी आढळून आल्या. या शाळांकडे शाळा सुरू करण्यासाठी ना-हरकत प्रमाणपत्र (एनओसी) नसणे, शाळांसाठी लागणारे शिक्षण मंडळ आणि शासनाचे संलग्न प्रमाणपत्र नसणे अशा या त्रुटी आढळून आल्या आहेत. यापैकी कोणताही एक कागद नसल्यास त्या शाळेची मान्यता रद्द करण्यात येईल, असा इशारा राज्याचे शिक्षण आयुक्त सूरज मांढरे यांनी दिला आहे. शाळांना शासनाची मान्यता आहे की, नाही याची खातरजमा करूनच शाळांमध्ये आपल्या पाल्याला प्रवेश द्यावा, अशा सूचनाही शासनाने दिल्या आहेत. नाहीतर अशा शाळांमध्ये शिकून दिवस, वर्ष वाया जातील. परिणामी त्यांचे व त्यांच्या पालकांचे शैक्षणिक नुकसान झाल्याशिवाय राहणार नाही. म्हणून पालकांनी खातरजमा करून आपल्या मुलास चांगल्या शाळेत दाखल केले पाहिजे. राज्य सरकारने शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण करून कायदा केला आहे. या शिक्षण कायद्यानुसार कुणीही शिक्षणापासून वंचित राहता कामा नये. म्हणूनच शाळाबाह्य मुलांचा शोध घेऊन त्यांना शिक्षण प्रवाहात आणले जात आहे. इतकेच काय ऊसतोड कामगारांच्या मुलांना ते राहतात त्या ठिकाणी शिक्षण दिले जाणार आहे.

बचत पाण्याची; गरज काळाची

उन्हाळा ऋतू चालू असूनसुद्धा अधून मधून अवकाळी पावसाचे आगमन होत आहे. यामुळे फग्ळबागायतदार चिंतेत पडले असून दरवर्षीप्रमाणे उन्हाळ्यात पाणीटंचाईला सर्वसाधारण नागरिकांना सामोरे जाण्याची वेळ आली आहे. याचा जास्त चटका ग्रामीण भागातील जनतेला होतो. आता तर मुंबईमध्येसुद्धा महिनाभर १५ टक्के पाणीकपात केली जाणार आहे. तेव्हा राज्यातील जनतेने पाण्याचे महत्त्व लक्षात घेऊन पाण्याचा काटकसरीने वापर करावा. पाणी हे निसर्गाचे अनमोल रत्न असल्यामुळे त्यास वाचविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. तेव्हा पाणी जपून वापरल्यामुळे आपला पुढील काळ सुरक्षित राहणार आहे. तेव्हा पाण्याची बचत करणे आजच्या काळाची गरज झाली आहे.

देशाच्या विकासाच्या दिशेने वाटचाल करीत असताना पाण्याचा पण जास्त प्रमाणात वापर होऊ लागला. मात्र त्यावेळी पाण्याचे महत्त्व लोकांना समजत नव्हते. आता पाण्याचे महत्त्व नागरिकांना कळू लागल्यामुळे पाण्याची बचत करण्यासाठी वर्तमानपत्रांमध्ये लिहिण्याची वेळ आली. शासन तर शासकीय परिपत्रक काढून बचतीचा संदेश देतात. त्याचप्रमाणे पाण्याचे महत्त्व लक्षात घेऊन जनजागृती करण्यात येते. काही ठिकाणी पाणी परिषद घेऊन पाण्याचे महत्त्व लोकांना पटवून दिले, मात्र त्याकडे नागरिकांनी दुर्लक्ष केल्याचे दिसते. त्यामुळे आता शासनाला पाणीकपात करण्याची वेळ आली.

महत्त्वाची बाब म्हणजे, पाण्याच्या गैरवापरामुळे व त्याच्या योग्य नियोजनाच्या अभावामुळे आता पाणीटंचाईची वेळ आली. कारण पाण्याचा वापर करीत असताना पाणी दूषित होत असते याची काळजी घेतली जात नाही. उदाहरणार्थ गाडी धुताना पाण्याचा वापर केला जातो. त्यामुळे पाणी दूषित होते त्याकडे मात्र लक्ष दिले जात नाही. दूषित पाण्यामुळे नागरिकांनासुद्धा आपल्या जीवाला मुकावे लागते, हे वर्तमानपत्रामध्ये वाचायला मिळते. आता तर उन्हाळा असल्यामुळे पाण्याच्या प्रत्येक थेंबाला जपावे लागते. काही गावामध्ये एक दिवस आड करून एक तास पाणी येते. त्यासाठी प्रत्येक घराला रुपये एकशे पन्नास महिन्याला ग्रामपंचायतीला द्यावे लागतात. सध्या बऱ्याच गावातील लोक पाणी पाणी करीत आहेत. याचा परिणाम आपल्याला पाणी मिळत नसल्यामुळे ग्रामपंचायतीमध्ये सभा चालू असताना आपल्याला पाणी मिळत नसल्याच्या रागाने सभेतून बाहेर येऊन सभागृहाला बाहेरून कडी घालण्याची वेळ ग्रामस्थांवर आलेली आहे. म्हणजे घोटभर पाण्यासाठी लोक काय करू शकतात याची कल्पना येते. तेव्हा आपल्या गावातील नागरिकांना पाण्यासाठी ग्रामपंचायतीमध्ये येण्याची वेळ येणार नाही, याची लोकप्रतिनिधीनी काळजी घेणे आवश्यक आहे. हंडा घेऊन ग्रामपंचायतीमध्ये येण्याची वेळ गावातील ग्रामस्थांवर का आली? या प्रश्नाचे उत्तर ग्रामपंचायतील ग्रामसेवक, सरपंच, उपसरपंच आणि सदस्यांनी शोधले पाहिजे.

पाण्याच्या पातळीचा विचार करता दिवसेंदिवस पाण्याची पातळी कमी होताना दिसत आहे. याला अनेक कारणे असतील. मात्र त्याचा शोध घेणे गरजेचे आहे. पाणी हेच आपले सर्वांचे जीवन आहे. तेव्हा प्रत्येकांनी पाण्याची बचत केली पाहिजे. तसेच पाणी दूषित होणार नाही, याची पण दक्षता घ्यायला हवी. त्यासाठी पाणी हे निसर्गनिर्मित असल्याने पाण्याचा योग्य वापर करायला हवा.

महत्त्वाची बाब म्हणजे, पाण्याचा अति वापर होणार नाही याची काळजी नागरिकांनी घ्यावी. पाण्याचा वापर करताना योग्य कामासाठी योग्य प्रकारे वापर करायला हवा. बऱ्याच वेळा पाणी वाया जाते. असे वाया जाणारे पाणी झाडांना घालावे. झाडे जगली तर पाऊस लागेल, पाऊस लागल्यावर झाडाची मुळे पाणी अडवून ठेवू शकतात. बऱ्याच वेळा अशा परिस्थितीकडे दुर्लक्ष होताना दिसतो. यामध्ये घरातील पाण्याचा वापर करण्यासाठी जसे भांडी धुण्यासाठी, आंघोळ करण्यासाठी, गाडी धुण्यासाठी, झाडांना पाणी घालणे अशा अनेक कामासाठी बऱ्याचवेळा पाण्याचा अपव्यय होतो. तो कटाक्षाने पाळला पाहिजे. काही राजकीय पुढाऱ्यांनी दाडी करताना पेल्यातून पाणी घेऊन पाणी बचतीचा नवा संदेश मागील दहा वर्षांपूर्वी दिला होता. मात्र त्याकडे आपण दुर्लक्ष केले.

दिवसेंदिवस सिमेंटची वाढती मैदाने, विकासाच्या नावाखाली डोंगर सपाट करणे, झाडांची कत्तल करणे, नवीन झाडांची लागवड न करणे व दगडांचे उत्खनन करणे अशा अनेक कारणांमुळे पावसाचे पाणी जमिनीत न मुरता थेट नदी नाल्यांवाटे समुद्राला मिळते. त्यामुळे पाण्याची पातळीपण कमी कमी होताना दिसते. आपल्या राज्यात सुशोभीकरणाचे काम चालू आहे. हे स्वच्छतेच्या बाबतीत समाधानकारक असले तरी पाण्याच्या स्वच्छतेकडेसुद्धा लक्ष देणे गरजेचे आहे. कारण पाणी हेच मानवाचे जीवन आहे. विकासाच्या वाटेवर झाडांचा अडथळा येत असल्यामुळे झाडे तोडली जात आहेत. मात्र त्या प्रमाणात नव्याने झाडे लावणे आवश्यक आहे. मात्र तसे होताना दिसत नाही. बऱ्याच ठिकाणी पावसाचे प्रमाणही कमी झालेले दिसत आहे. सध्या पाऊस कधीही लागतो, अशी परिस्थिती पाहायला मिळते. पाणी हे प्रत्येकाच्या जीवनाचा आधार आहे. तेव्हा पाण्याचा विनाकारण होणारा अपव्यय टाळला पाहिजे.

देणे मराठी शाळेचे

शिक्षणाचे माध्यम कोणते असावे? हा विषय या सदरांतून विविध संदर्भात चर्चिला गेला आहे. माझ्या एका तरुण प्राध्यापक सहकाऱ्याचे मला याबाबत विशेष कौतुक वाटले. आपल्या दोन्ही मुलींकरता त्याने मराठी माध्यम निवडले. खरे तर तुम्ही मुलांना कोणत्या माध्यमात घातले आहे किंवा पालक म्हणून काय ठरवताय, हा प्रश्न विचारणे मी केव्हाच सोडून दिले आहे. सरसकट इंग्रजी माध्यमाकडे झुकणारा मराठी भाषक पालकांचा कल हा मुद्दा माझ्यासारख्या मराठीकरता आग्रही असणाऱ्या कार्यकर्तीला वैफल्य आणणारा आहे.

पण अमोल भोसले या अगदी तरुण प्राध्यापकाने आपल्या मुलींकरता मराठी माध्यम निवडणे हा मुद्दा मला या विषयाच्या पार्श्वभूमीवर विशेष वाटला. मी त्याला म्हटले, 'अरे वा, तुला का वाटला हा निर्णय घ्यावासा? त्यावर तो म्हणाला, 'मी मराठी माध्यमातूनच शिकलोय ना. मग तसंच मुलांना मराठीतून शिकवणे हे अगदी स्वाभाविकपणे घडले.' कविता, चित्र, अभिनय या सर्व कला त्याच्या दोन्ही मुलींमध्ये सहज रुजल्या आहेत. निर्मितीशीलता, अभिव्यक्ती, सर्जनशीलता या गोष्टींची रुजवात मुलांमध्ये मातृभाषेतून सहज होते. तसेच इतरांना समजून घेण्याची संवेदनशीलता वाढते.

उच्च मध्यम वर्ग व मध्यम वर्गातील पालक अनेकदा असे म्हणू लागले आहेत की, मराठी शाळेत भाजीवाले नि रिक्षावाल्यांची मुले येऊ लागली आहेत, त्यामुळे आमच्या मुलांना आम्ही पाठवू शकत नाही. म्हणजे या अशा भिंती आपणच आपल्या मुलांमध्ये निर्माण करायच्या. मग समाज कसा प्रवाही राहणार? तळागाळातील माणसांना समजून घेण्याची क्षमता आपण मुलांमधून संपवून टाकायची, हे क्रूर आहे. श्रीमंत वर्गातील मुलांनी त्यांच्याच वर्गातील मुलांशी मैत्री करायची? ही कुठली सवय आपण मुलांना लावतोय.

समाजातील या अशा भिंतींमुळेच आपण अजून वर्गांना जखडून आहोत. माझी मुलगी जे. जे. स्कूलमध्ये महाविद्यालयीन अभ्यासक्रम पूर्ण करत असताना मला म्हणाली, 'आई, तू मला मराठी शाळेत शिकवलेस हे किती छान केलेस. गावागावांतून चित्रकलेचा अभ्यास करण्याकरता आलेली मुले त्यांचे प्रश्न, अडचणी सहज सांगतात नि त्या सोडवण्याकरता काय करायचं, हे आम्ही मिळून ठरवतो. तसंच परदेशातली नि परराज्यातील मुले देखील आमच्याकडे आहेत, त्यांच्याशी देखील संवादाचा आत्मविश्वास माझ्यात आहेच. मराठी शाळा मुलांना काय देते? याचे उत्तरच मला तिच्या उद्गारांतून मिळाले.

Mumbai Live

मराठी शाळा मुलांना समाजाशी जोडून ठेवते. माणसांचे चेहरे वाचायला शिकवते. समाजाच्या प्रश्नांचा अर्थ उलगडायला मदत करते. आणि विश्वाच्या अवकाशात उभे राहण्याचे सामर्थ्यही देते. हे केवळ भावनिक मनोगत नव्हे, मराठी शाळेत शिकलेल्या हजारो मुलांनी हे सिद्ध केले आहे. पण हे मायभाषेचे देणे समजून घ्यायला आपल्याला वेळ आहे का?

मराठी साप्ताहिक
सह्याद्रीचा राखणदार

तर... 'त्या' कार्यान्वयीन यंत्रणेवर होणार कारवाई

'वन स्टॉप सेंटर' बाबत महिला व बालविकास विभागाचे स्पष्टीकरण, दरवर्षी नियमितपणे बैठकीचे आयोजन

चंद्रपूर / प्रतिनिधी
जिल्ह्यातील 'वन स्टॉप सेंटर' सद्यस्थितीत सरस्वती महिला शिक्षण मंडळ, चंद्रपूर या कार्यान्वयीन यंत्रणेद्वारे चालविण्यात येत आहे. सदर संस्थेने मानसिक छळ केला असून राजीनामा देण्यास भाग पाडले, अशी तक्रार पुनम बांबोळे यांनी केली आहे. याप्रकरणाची चौकशी सुरू असून यात कार्यान्वयीन यंत्रणा दोषी आढळल्यास व्यवस्थापन समितीच्या निर्देशाने योग्य कारवाई करण्यात येईल, असे महिला व बालविकास विभागाने स्पष्ट केले आहे.

One Stop Centre Scheme For Women:

केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनेप्रमाणे महिला व बालविकास विभागांतर्गत 'वन स्टॉप सेंटर' चे दैनंदिन कामकाज चालविण्यासाठी कार्यान्वयीन यंत्रणा व मानधन तत्वावर कर्मचारी नियुक्ती करण्याबाबत तरतूद आहे. जिल्हाधिकारी अध्यक्ष असलेल्या व्यवस्थापकीय समितीमार्फत सरस्वती महिला शिक्षण मंडळ, चंद्रपूर या संस्थेची ५ ऑक्टोबर २०२० रोजी कार्यान्वयीन यंत्रणा म्हणून निवड करण्यात आली आहे. तसेच कोणत्याही यंत्रणेला एका वेळी तीन वर्षापेक्षा जास्त कालावधीसाठी नियुक्ती देण्यात येऊ नये, असे शासनाचे निर्देश आहे. त्यानुसार सदर यंत्रणेची मुदत ३० एप्रिल २०२३ रोजी संपुष्टात येणार आहे.

'वन स्टॉप सेंटर' चे दैनंदिन कामकाज चालविण्याकरीता एकूण १४ पदे मंजूर असून सर्व पदे मानधन तत्वावर कार्यान्वयीन यंत्रणेमार्फत भरण्यात आली आहेत. तसेच सदर पदे अस्थायी स्वरुपाची आहेत. संस्थेचीच मुदत कमाल तीन वर्षाची असल्याने कोणताही कर्मचारी स्थायी होऊ शकत नाही. तसेच संस्थेत किमान पाच वर्षे कार्यरत असलेल्या कोणत्याही कर्मचा-याला कामावरून काढण्यात येऊ नये, अशा शासनाच्या कोणत्याही मार्गदर्शक सुचना नाही.

तक्रारकर्त्या पुनम बांबोळे यांनी कार्यान्वयीन यंत्रणेने मानसिक छळ केला असून राजीनामा देण्यास भाग पाडले, अशी तक्रार केली आहे. या तक्रारीची महिला व बालविकास विभागाकडून चौकशी सुरू आहे. यात संबंधित यंत्रणा दोषी आढळून आल्यास व्यवस्थापन समितीच्या निर्देशाने योग्य कारवाई करण्यात येईल.

तसेच 'वन स्टाप सेंटर' बाबत जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली व्यवस्थापन समितीची बैठक दरवर्षी घेण्यात येते. सन २०२२ – २३ या वर्षात २० सप्टेंबर २०२२ रोजी बैठक घेण्यात आली होती. तर सन २०२३ – २४ ची बैठक प्रस्तावित असून लवकरच घेण्यात येईल, असे जिल्हा महिला व बालविकास अधिकारी दीपक बानाईत यांनी कळविले आहे.

आनंदनिकेतन महाविद्यालयाचे वीस विद्यार्थी गुणवत्ता यादीत

चंद्रपूर / प्रतिनिधी
सन १९६४ ला आनंदनिकेतन महाविद्यालयाचे आर्ट्स,सायन्स, कॉमर्स सुरू झाले. सामाजिक सेवेचा वसा असणाऱ्या महाविद्यालयाने कायमच गुणवत्तापूर्वक शिक्षणाला प्राधान्य दिले.१९६४ पासून महाविद्यालयाने सांस्कृतिक सामाजिक तथा शैक्षणिक क्षेत्रात जी उंची गाठली होती ती आजही कायम ठेवली आहे.

२०१६-१७ पासून आनंद निकेतन महाविद्यालयात एम.एस.सी सुरू करण्यात आले.विशेष म्हणजे तेव्हापासून सातत्याने एम.एस.सी च्या परीक्षेमध्ये महाविद्यालयातील विद्यार्थी मेरिट लिस्ट मध्ये येत आहेत.अभिमानाची बाब म्हणजे सन २०२१-२२ या वर्षातही महाविद्यालयाच्या वीस विद्यार्थ्यांनी प्रामुख्याने एम. एससी, एमए व बी.एस्सी परीक्षांच्या गुणवत्ता यादीत स्थान मिळवले.यावर्षी अभिमानाची बाब म्हणजे एम.एससी वनस्पतीशास्त्र या विषयात मेरिट लिस्ट मधले पहिले पाचही विद्यार्थी महाविद्यालयाचे आहेत.कु कल्याणी शिंगरू,कु.प्रतीक्षा कायरकर,
कु.वर्षा गोवारदिपे,कु.अश्विनी ताजने व कु.प्रतीक्षा नरवाडे यांनी अनुक्रमे पहिला,दुसरा,तिसरा,चौथा व पाचवा येण्याचा मान मिळवला.एम.एससी पदार्थविज्ञान या विषयात श्री. अजय पडोले व श्री.गौरव लढी हे गुणवत्ता यादीत अनुक्रमे पहिले व दुसरे आले. कु.निकिता देवतळे,कु.योगिनी लोणकर,कु.प्रियांका चौधरी व कु.किरण बारेकर यांनीही एम.एससी प्राणीशास्त्र या विषयात अनुक्रमे पहिला,दुसरा,तिसरा व पाचवा येण्याचा मान मिळवला.एम.एस्सी रसायनशास्त्र या विषयात देखील कु.अश्विनी बेहेरे व कु.नेहा बावणे यांनी तिसरा व चौथा क्रमांक पटकावला.एम.एससी गणितात श्री. राहुल नौकरकर याने विद्यापीठातून पाचवा येण्याचा सन्मान प्राप्त केला.
२०२०-२१ या वर्षात महाविद्यालयात एम.ए. सुरु करण्यात आले.आणि याच वर्षी एम.ए. समाजशास्त्र या विषयात कु.भाग्यश्री शेळके हिने चौथा, एम.ए. राज्यशास्त्र या विषयात कु. रजनी बैलमारे हिने पाचवा तर एम.ए. अर्थशास्त्र या विषयात श्री.हितेश घुगल यांनी नववा मेरिट येण्याचा सन्मान प्राप्त केला. कु.प्रियंका नौकरकर व कु.पूजा आवारी यांना बी.एससी पदवीमधून चौथे व नववे मेरिट स्थान मिळाले. आणि विशेष म्हणजे कु. प्रियंका नौकरकर हिला बीएस्सी वनस्पतीशास्त्र या विषयात विद्यापीठातून सर्वात जास्त गुण मिळाले. महारोगी सेवा समितीचे सचिव आ.डॉ. विकास आमटे, आनंदवन विश्वस्त मंडळ, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.मृणाल काळे, महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी,पालक वर्ग सर्वच जण विद्यार्थ्यांच्या या यशाचे कौतुक करत आहे.

वर्षभरात १६ प्रतिबंधित अन्नपदार्थ विक्रेत्यांवर अन्न व औषध प्रशासनाची कारवाई

एकूण २४ लक्ष ३३ हजारांचा मुद्देमाल जप्त, अन्नपदार्थाच्या दर्जाविषयी तक्रार असल्यास हेल्पलाईनवर संपर्क करण्याचे आवाहन

चंद्रपूर / प्रतिनिधी
महाराष्ट्रात गुटखा, पान मसाला, खर्रा, सुगंधित सुपारी, सुगंधित तंबाखु इत्यादी अन्नपदार्थाच्या निर्मिती, साठा, विक्री, वितरण, वाहतूक यावर बंदी घातली आहे. सर्वसाधारण जनतेच्या आरोग्याच्या हितासाठी अधिसूचनेतील तरतुदींची कडक अंमलबजावणी अन्न व औषध प्रशासन, चंद्रपूर कार्यालयामार्फत करण्यात येत आहे. गत वर्षभरात (१ एप्रिल २०२२ ते ३१ मार्च २०२३) एकूण १६ प्रतिबंधित अन्नपदार्थ (खर्रा, सुगंधित तंबाखु, सुगंधित सुपारी) विक्रेत्यांवर कारवाई करण्यात आली असून एकूण २४ लक्ष ३३ हजार ११४ रुपयांचा मुद्देमाल जप्त करून संबंधितांवर गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

- जिल्ह्यात कोणीही प्रतिबंधित अन्न पदार्थ जसे खर्रा, सुगंधित तंबाखु, सुगंधित सुपारी संबंधित कोणताही व्यवसाय केल्यास कठोर कारवाई करण्यात येईल. तसेच अन्नपदार्थाच्या दर्जाविषयी कोणतीही माहिती / तक्रार / सुचना असल्यास एफडीए हेल्पलाईन क्र. १८००२२२३६५ यावर संपर्क करावा, असे आवाहन अन्न व औषध प्रशासनाने केले आहे.

गत आठवड्यात अन्न व औषध प्रशासन कार्यालयाने व्याहाड (बु), ता. सावली येथील राहूल पुरुषोत्तम खोब्रागडे, रा. द्वारा मेहबुब खा पठान यांच्याकडून प्रतिबंधित अन्नपदार्थाचा एकूण ११७ कि. ग्रॅ. (किंमत १ लक्ष १५ हजार) मुद्देमाल जप्त केला. तसेच सदर साठ्याचे पुरवठादार विनय गुप्ता, रा. गोकुल नगर, गडचिरोली व राहूल पुरुषोत्तम खोब्रागडे, रा. द्वारा मेहबुब खा पठान यांच्याविरुध्द सावली पोलिस स्टेशन येथे प्रथम खबरी अहवाल दिला आहे.

तर २८ मार्च २०२३ रोजी मे. बेले पान मटेरियल व किराणा, भानापेठ वार्ड, चंद्रपूर यांच्याकडून एकूण ४.३२ कि. ग्रॅ. (किंमत ६४२० रुपये) व मे. पवन ट्रेडर्स, सुनिल खियानी यांचे गोडावून, भानापेठ वार्ड, चंद्रपूर यांच्याकडून एकूण ३.६५ कि. ग्रॅ. (किंमत ४८४४ रुपये) मुद्देमाल जप्त केला. या कारवाईत प्रेमकुमार बाबूरावजी बेले व पवन अशोक जवाहरमलानी तसेच वसीम झिमरी (पुरवठादार) यांचे विरुध्द शहर पोलिस स्टेशन, चंद्रपूर येथे प्रथम खबरी अहवाल देण्यात आला आहे.

राजुरा येथील मे. गणेश प्रोव्हिजन, नेहरु चौक, मे. जलाराम किराणा स्टोअर्स, आसीफाबाद रोड, व मे. महाराष्ट्र पान मटेरियल, गडचांदूर रोड येथे तपासण्या करण्यात आल्या असून तपासणी दरम्यान कोणताही प्रतिबंधित अन्नपदार्थाचा साठा आढळून आला नसल्याचे सहाय्यक आयुक्त (अन्न) नितीन मोहिते यांनी कळविले आहे.

राज्य सरकार चंद्रपूर मतदार संघाच्या विकासासाठी सकारात्मक : आ. किशोर जोरगेवार

९० लक्ष रुपयांच्या विकासकामांचे आमदार किशोर जोरगेवार यांच्या हस्ते भूमिपूजन

भुमिपूजन सोहळा
रविवार दि. २ एप्रिल २०२३ वेळ : सायंकाळी. ६.०० वाजता.
नगर विकास निधी अंतर्गत
कामाचे नाव - बि.एम.टी. चौक ते मानवकेंद्र पासुन ते शिव मंदीर चौक पर्यंत सिमेंट कॉक्रीट रोड चे बांधकाम करणे.
अंदाजीत किंमत ५० लक्ष रुपये.

चंद्रपूर / प्रतिनिधी
अपक्ष आमदार म्हणून चंद्रपूरकरांनी ऐतिहासिक मताधिक्याने निवडून दिल. मतदार संघाच्या विकासासाठी सत्ते सोबत राहणे गरजेचे होते. आता याचा विकासकामांच्या रूपाने मोठा फायदा होत आहे. मागील आठ दिवसात विविध विभागाच्या माध्यमातून १५ कोटी रुपयांचा निधी मतदार संघाच्या विकासाठी उपलब्ध केला असून राज्य सरकार चंद्रपूर मतदार संघाच्या विकासासाठी सकारात्मक असल्याचे प्रतिपादन आमदार किशोर जोरगेवार यांनी केले.

रयतवारी कॉलनी आणि घुटकाळा वार्ड येथे ९० लक्ष रुपयांच्या विकासकामाचे आमदार किशोर जोरगेवार यांच्या हस्ते भूमिपूजन करण्यात आले. यावेळी ते बोलत होते. या कार्यक्रमाला यंग चांदा ब्रिगेडचे जिल्ह्य महानगर अध्यक्ष पंकज गुप्ता, सामजिक कार्यकर्ता इंदुलता गुप्ता, अल्पसंख्याक विभागाचे युथ अध्यक्ष राशेद हुसेन, , दीपक वर्मा, अजय मिस्त्री, नवशाद सीध्दिकी, विनोद गुप्ता, सुरेंद्र सोनकर, गोरेलाल केवट, सुलतान अली, चंद्रराज बातव, भोलाप्रसाद प्रजापती, रणजीत राजभर, रितेश सोनकर, अमोल वर्मा, जितेंद्र जयस्वाल, मायादिन रविदास आदींची उपस्थिती होती.

यावेळी बोलताना आ. जोरगेवार म्हणाले कि, चंद्रपूर मतदारसंघातील विकासकामांना गती मिळाली आहे. शिंदे, फडणवीस सरकारच्या माध्यमातून चंद्रपूर मतदार संघाच्या विकासासाठी मोठा निधी उपलब्ध होत आहे. बाबूपेठ येथील हिंग्लाज भवानी वार्डातील विकासासाठी आपण विशेष रस्ता निधी अंतर्गत ५ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला आहे. या निधीतून येथे सोयी सुविधा उपलब्ध केल्या जाणार आहे. तर शहरातील महत्वाच्या विकासकामांसाठी प्रादेशिक पर्यटन विकास योजने अंतर्गत ५ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. या निधीतून चंद्रपूर – नागपूर मार्गावर भव्य प्रवेशव्दार, प्रियदर्शनी चौक आणि जुना वरोरा नाका चौक येथे सौंदर्यीकरण आणि महाकाली पोलीस चौकी समोरील शहीद हेमंत करकरे चौक येथे सौंदर्यीकरण आदी कामे करण्यात येणार आहे. सामाजिक न्याय विभागाच्या दलित वस्ती सुधार निधी अंतर्गतही ५ कोटी रुपयांचा निधी मजूर झाला आहे. या निधीतून शहरातील अनेक विकास कामे केल्या जाणार असल्याचे ते यावेळी म्हणाले.

रयतवारी कॉलनी येथील सिमेंट कॉक्रीट रोडचे बांधकाम करण्यात यावे अशी मागणी येथील नागरिकांनी केली होती. या कामासाठी नगर विकास विभागाच्या मुलभूत सोई सुविधा निधी अंतर्गत ५० लक्ष रुपयांचा निधी उपलब्ध करून देता आला याचा आनंद होत आहे. घुटकाळा येथे ही आपण ४० लक्ष रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला असून तेथील विकासकामाचे ही भूमिपूजन करण्यात आले.

शिवसेना (ठाकरे) गटाकडून भद्रावती कृउबास निवडणूक प्रचाराचा शुभारंभ

शिवसेना (ठाकरे) वरोरा-भद्रावती विधानसभा प्रमुख तथा सामाजिक कार्यकर्ते रविंद्र शिंदे यांचे नेतृत्व

भद्रावती / प्रतिनिधी
स्थानिक कृषी उत्पन्न बाजार समितीच्या संचालक मंडळाची पंचवार्षिक निवडणूक येत्या दि. ३० एप्रिल रोजी होत आहे. या निवडणूकीच्या रणसंग्रामात शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे हा पक्ष उतरला आहे. पक्षाचे वरोरा-भद्रावती विधानसभा प्रमुख तथा सामाजिक कार्यकर्ते रविंद्र शिंदे यांच्या नेतृत्वात ही निवडणूक लढविण्यात येत आहे. भद्रावती तालुक्यातील सहकार व ग्रामीण क्षेत्रातील असंख्य कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत स्थानिक भद्रनाग स्वामी महाराज मंदिरात पूजाअर्चा करून प्रचाराचा श्रीगणेशा करण्यात आला.

काल दि. ७ एप्रिल रोज शुक्रवारला भद्रावती तालुक्याचे आराध्य दैवत श्री भद्रनाग स्वामी महाराज मंदिर येथे वरोरा-भद्रावती विधानसभा प्रमुख रविंद्र शिंदे यांच्या शुभ हस्ते पुजाअर्चा केल्यानंतर नारळ फोडून निवडणूक प्रचाराचा शुभारंभ करण्यात आला.

भद्रनाग स्वामी महाराज मंदिरात पूजाअर्चा

याप्रसंगी उपजिल्हा प्रमुख भास्कर ताजणे, तालुका प्रमुख तथा नगरसेवक नरेंद्र पढाल, भद्रावती नागरी सहकारी पत संस्थेचे माजी अध्यक्ष तथा विद्यमान संचालक व माजी नगराध्यक्ष ज्ञानेश्वर डूकरे, माजी नगरसेवक तथा गुरुजी फाऊन्डेशचे अध्यक्ष प्रशांत कारेकर, अखील भारतीय सरपंच संघटनेचे तालुका अध्यक्ष तथा पानवडाळा ग्रा.पं. सरपंच प्रदिप महाकुलकर, मुधोली ग्रा.पं.सरपंच बंडू पा. नन्नावरे,नंदोरी ग्रा.पं. उपसरपंच मंगेश भोयर, मुरसा ग्रा.पं. उपसरंपच सुनिल मोरे, भद्रावती कृ. उ. बा.स. च्या माजी उपसभापती अश्लेषा जीवतोडे-भोयर, शांता रासेकर यांच्यासह तालुक्यातील ग्रा.पं. सरपंच, उपसरपंच, ग्रा.पं. सदस्य, सेवा सहकारी संस्थेचे पदाधिकारी व सदस्य यांच्यासह असंख्य शिवसैनिक व कार्यकर्ते उपस्थित होते.

गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजनेंतर्गत जिल्ह्यातील ५०३ प्रकरणात १० कोटींचे वाटप

चंद्रपूर / प्रतिनिधी
गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजनेंतर्गत अपघातग्रस्त शेतक-यास व त्याच्या कुटुंबास शासनाकडून आर्थिक लाभ देण्यात येतो. या अंतर्गत जिल्ह्यात सन २०१८ – १९ पासून आजपर्यंत एकूण ५०३ प्रकरणे मंजूर करण्यात आली असून संबंधितांना १० कोटी ६ लक्ष रुपयांचे अनुदान वाटप करण्यात आले आहे.

शेती व्यवसाय करतांना होणा-या विविध अपघातांमुळे शेतक-याचा मृत्यु झाल्यास तसेच अपघातामुळे दोन डोळे अथवा दोन हात किंवा दोन पाय निकामी झाल्यास दोन लक्ष रुपये तर एक डोळा अथवा एक हात किंवा एक पाय निकामी झाल्यास एक लक्ष रुपये अनुदान शासनाकडून देण्यात येते. गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजनेंतर्गत जिल्ह्यात आतापर्यंत ७८२ अर्ज दाखल करण्यात आले. यापैकी ५०३ प्रकरणे मंजूर करण्यात आली असून संबंधित लाभार्थी कुटुंबाला १० कोटी ६ लक्ष रुपये अनुदान वाटप करण्यात आले आहे. तर १३२ प्रकरणे प्रक्रियेमध्ये असून १४७ प्रकरणे रद्द झाली आहेत. मंजूर ५०३ प्रकरणांपैकी १९८ प्रकरणे खंडीत कालावधीतील आहे.

शेतकऱ्यांच्या सेवार्थ
IN SERVICE OF THE FARMERS
DEPARTMENT OF AGRICULTURE, M.S.
कृषि विभाग, महाराष्ट्र राज्य
गोपीनाथ मुंडे
शेतकरी अपघात विमा योजना

- या योजनेंतर्गत केवळ सातबारावर नाव असलेल्या संबंधित व्यक्तिलाच नव्हे सातबारावर नाव नसलेल्या कुटुंबातील इतर सदस्याचा अपघात किंवा अपंगत्व आल्यास वरीलप्रमाणे लाभ देण्यात येतो. त्यामुळे २०१८ – १९ पासून या योजनेत अपघातप्रकरणी फक्त सातबाराधारक सदस्य गृहीत न धरता संपूर्ण कुटुंबाला संरक्षित करण्यात आले आहे. विशेष म्हणजे संपूर्ण कुटुंबाला संरक्षित करण्याचा धोरणात्मक निर्णय तत्कालीन अर्थमंत्री तथा पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या पुढाकाराने घेण्यात आल्याचे जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी भाऊसाहेब ब-हाटे यांनी सांगितले.

खंडीत कालावधी : अपघाती मृत्यु प्रकरणी शेतक-याच्या कुटुंबाला शासकीय अनुदान देण्याकरीता शासनाकडून एका वर्षाच्या कालावधीकरीता विमा कंपनीची नियुक्ती केली जाते. सदर विमा कालावधी संपुष्टात आल्यावर दुस-या कंपनीची नियुक्ती होईस्तोवर सदर कालावधी हा खंडीत म्हणून गृहीत पकडला जातो. अशा कालावधीत विमा दावे आयुक्तालय स्तरावर सादर करण्यात येतात.

अनुदानाचे स्वरुप : शेती व्यवसाय करतांना विविध अपघातामुळे शेतक-याचा मृत्यु झाल्यास दोन लक्ष रुपये अनुदान देण्यात येते. तसेच अपघातामुळे दोन डोळे अथवा दोन हात किंवा दोन पाय निकामी झाल्यास दोन लक्ष तर एक डोळा अथवा एक हात किंवा एक पाय निकामी झाल्यास एक लक्ष रुपये अनुदान देण्यात येते.

समाविष्ट असलेले अपघात : रस्ता / रेल्वे अपघात, उंचावरून पडून मृत्यु, पाण्यात बुडून मृत्यु, नक्षलवाद्यांकडून होणा-या हत्या, सर्पदंश, विंचू दंश, वीज पडून मृत्यु, इलेक्ट्रिक शॉक, अपघाती विषबाधा, जनावरांच्या हल्ल्यामुळे किंवा चावल्यामुळे होणारे अपघाती मृत्यु इत्यादी. अपघातामुळे शेतक-याचा मृत्यु किंवा अपंगत्व आल्यास वारसदारांना लाभ देण्यात येतो.

आवश्यक कागदपत्रे : क्लेम फॉर्म भाग – १ व सहपत्र, क्लेम फॉर्म भाग – २ (अ) व (ब), क्लेम फॉर्म भाग – ३, सातबारा उतारा, ६ – क (वारस नोंद उतारा), ६ – ड (फेरफार उतारा), वयाचा पुरावा (स्वयंसाक्षांकित प्रत), शिधापत्रिका (स्वयंसाक्षांकित प्रत), मृत्यु दाखला / अपंगत्वाचा दाखला (स्वयंसाक्षांकित प्रत), प्रथम माहिती अहवाल (एफआयआर) (स्वयं साक्षांकित प्रत), घटनास्थळ पंचनामा (स्वयंसाक्षांकित प्रत), पोलिस पाटील माहिती अहवाल (एफआयआर नसल्यास), इन्क्वेस्ट पंचनामा, शवविच्छेदन अहवाल, व्हिसेरा अहवाल (आवश्यक असल्यास), वाहन परवाना (आवश्यक असल्यास), बँक पासबुक (झेरॉक्स प्रत), अपंगत्वाच्या टक्केवारीचे प्रमाणपत्र व फोटो, नावात / आडनावात बदल असल्यास प्रतिज्ञापत्र.

सामाजिक न्याय पर्व अभियानांतर्गत जात प्रमाणपत्र पडताळणी समिती मार्फत विशेष मोहिमेचे आयोजन

चंद्रपूर / प्रतिनिधी
जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीद्वारा जात प्रमाणपत्र पडताळणीबाबत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीचे औचित्य साधून १ एप्रिल ते १ मे २०२३ पर्यंतच्या कालावधीत सामाजिक न्याय पर्व अभियानांतर्गत विद्यार्थ्यांना जात वैधता प्रमाणपत्राचे वाटप, त्रुटीपूर्तता आदीबाबत विशेष मोहिमेचे आयोजन करण्यात येत आहे.

सामाजिक न्याय पर्वाअंतर्गत १७ ते २१ एप्रिल व २४ ते २८ एप्रिल २०२३ दरम्यान त्रुटीपूर्तता शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. ज्यांनी जात प्रमाणपत्र पडताळणीकरीता अर्ज दाखल केला आहे परंतु, अपूर्ण पुराव्या अभावी ज्यांची प्रकरणे त्रुटी मध्ये आहे, त्यांनी दिलेल्या दिनांकास किंवा त्यापूर्वी सादर केलेल्या अर्जाची सद्यस्थिती जाणून घेऊन सामाजिक न्याय पर्व यशस्वी करण्यास सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीचे उपायुक्त तथा सदस्य विजय वाकुलकर यांनी केले आहे.

जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, चंद्रपूर येथे ३१ मार्च २०२३ अखेरीस १२ वी मध्ये प्रवेशित एकूण ८ हजार १२६ विद्यार्थ्यांपैकी १ हजार २१० प्रकरणे समितीच्या कार्य क्षेत्राबाहेरील असून ६ हजार ७७९ प्रकरणे समितीकडे सादर करण्यात आली आहे व त्यापैकी ६ हजार ५३२ प्रकरणांमध्ये जातवैधता प्रमाणपत्र निर्गमित करण्यात आले आहे. तसेच इयत्ता ११वी मध्ये प्रवेशित एकूण ९ हजार ६६६ विद्यार्थ्यांपैकी ४४१ प्रकरणे समितीच्या कार्य क्षेत्राबाहेरील असून ८५६ प्रकरणे समितीकडे सादर करण्यात आली आहे व त्यापैकी ६२१ प्रकरणांमध्ये जात वैधता प्रमाणपत्र निर्गमित करण्यात आले आहे. तसेच प्रकरणे स्वीकारणे व निकाली काढण्याची प्रक्रिया प्रगतीपथावर आहे. सन २०२२-२३ सत्रामध्ये व्यावसायिक अभ्यासक्रमाचे २ हजार ९८१ प्रकरणे स्वीकारण्यात आली. त्यापैकी २ हजार ७५६ प्रकरणे समितीकडून निकाली काढण्यात आली आहे.

सन २०२२-२३ मध्ये प्रवेशित इयत्ता ११वी व १२वी मधील ज्या विद्यार्थ्यांनी अद्यापपर्यंत जात प्रमाणपत्र पडताळणी केलेली नाही तसेच व्यावसायिक अभ्यासक्रम सीईटी देऊन २०२३-२४ मध्ये प्रवेश घेऊ इच्छित असणाऱ्या विद्यार्थ्यांनी सामाजिक न्याय पर्वाच्या विशेष मोहिमेत सहभागी होऊन जात प्रमाणपत्राची पडताळणी आवर्जून करून घ्यावी. असे समितीमार्फत कळविण्यात आले आहे.

मूल येथील सावरकर गौरव यात्रेत सुधीर मुनगंटीवार यांचा विरोधकांना इशारा

सावरकरांचा अपमान केला तर धडा शिकवू

चंद्रपूर/प्रतिनिधी
भविष्यात कुणी सावरकरांचा अपमान केला तर त्याला भारतातील जनता धडा शिकविल्याशिवाय शांत बसणार नाही, असा इशारा देत 'राष्ट्रभक्तों का अपमान, नहीं सहेगा हिंदुस्तान' अश्या शब्दात सावरकर यांचा अवमान करणाऱ्या विरोधकांना राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य तसेच मत्स्य व्यवसाय मंत्री ना. मुनगंटीवार दिला.

मूल येथे आयोजित सावरकर गौरव यात्रेत ते बोलत होते. यावेळी भाजपाचे जिल्हाध्यक्ष देवराव भोंगळे, माजी जिल्हाध्यक्ष हरीश शर्मा, माजी जिल्हा परिषद अध्यक्ष संध्या गुरनुले, जिल्हा सरचिटणीस नामदेव डाहुले, महिला अध्यक्ष अल्का आत्राम, पंचायत समितीचे माजी सभापती चंदु मारगोनवार, माजी नगराध्यक्ष रत्नमाला भोयर, शहराध्यक्ष प्रभाकर भोयर, युवा मोर्चाचे अध्यक्ष आशिष देवतळे, नगर परिषदेचे माजी उपाध्यक्ष नंदु रणदिवे, अजय गोगुलवार, चंद्रकांत आष्टनकर, प्रशांत समर्थ, रेणुका दुधे, योगिता पिंपरे आदींची प्रमुख उपस्थिती होती.

ना.मुनगंटीवार पुढे म्हणाले, 'सावरकरांवर विनाकारण टीका करणाऱ्यांचा मेंदू आणि बुद्धी ठीक व्हावी अशी जागतिक आरोग्य दिनानिमित्त प्रार्थना करतो. केवळ दाढी वाढविल्याने कुणालाही पंतप्रधान होता येत नाही. त्यासाठी त्याग आणि बलिदान आवश्यक आहे. शिवाय मेंदूचा विकास झालेला असावा लागतो. राष्ट्रभक्तीची भावना जागरूक ठेवावी लागते.' 'संपूर्ण देशात जात-पात-धर्म विसरून स्वातंत्र्य लढ्यात योगदान देणाऱ्यांना अभिवादन केले जाते. परंतु काही लोकांना हे बलिदान दिसत नाही. ते सतत स्वातंत्र्यवीर सावरकरांवर टिका करीत असतात,' या शब्दांत त्यांनी विरोधकांवर टिका केली.

सावरकर हे जगातले एकमेव स्वातंत्र्यवीर आहेत ज्यांना मातृभूमीसाठी लढताना दोनवेळा जन्मठेप ठोठावण्यात आली. या शिक्षेमध्ये अमानुष अत्याचार सावरकरांवर करण्यात आलेत. हे अन्याय आजच्या युगात कुणीही सहन करू शकत नाही.

एवढा त्रास सहन करूनही सावरकरांनी स्वातंत्र्यासाठी लढा दिला, असेही ना. मुनगंटीवार म्हणाले.

त्यागाचे मूर्तीमंत उदाहरण

- स्वातंत्र्यवीर सावरकर आणि त्यांचे कुटुंब हे त्यागाचे मूर्तीमंत उदाहरण आहे. कारण त्यांच्यासोबत त्यांचे दोन्ही भाऊ देखील स्वातंत्र्यलढ्यात उतरले होते, याची आठवण ना. मुनगंटीवार यांनी करून दिली. 'सावरकर एकमेव असे व्यक्ती होते ज्यांच्या पुस्तकावर प्रकाशनापूर्वीच दोन देशांमध्ये बंदी लादण्यात आली. त्यामुळे ब्रिटिश सावरकरांना घाबरायचे. अशा सावरकरांचा अपमान मुळीच खपवून घेतला जाणार नाही,' असा इशाराही ना. मुनगंटीवार यांनी दिला.

म्हणून सावरकर गौरव यात्रा

- स्वातंत्र्यवीर सावरकर यांनी देशासाठी प्राणांची आहुती दिली. त्यांचे बलिदान इंग्रजांची सेवा घेणाऱ्या इटलीकर घराण्यापेक्षा कित्येक पटींनी मोठे आहे. त्यामुळे सावकारांविरोधात बोलणाऱ्यांचे डोके आणि बुद्धी भ्रष्ट झाले आहे. भ्रष्ट डोके ठिकाणावर आणण्यासाठीच सावरकर गौरव यात्रा काढण्यात येत आहे, या शब्दांत ना. सुधीर मुनगंटीवार यांनी विरोधकांना टोला लगावला.

फाळणीचे पाप

- देशाची फाळणी हे काँग्रेसचे पाप आहे. त्यांनी जाती-जातींमध्ये द्वेष पसरविण्याचे काम केले. हिंदुस्थानाचे तुकडे केले. त्यानंतरही राहुल गांधी कोणत्या तोंडाने स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्यावर टीका करतात? असा सवाल ना. मुनगंटीवार यांनी उपस्थित केला.

रेल्वे तिकीट काळाबाजार करणाऱ्या रॅकेटचा पर्दाफाश

चंद्रपूर / प्रतिनिधी
राष्ट्रीय स्तरावर पत्रकारांच्या न्याय हक्कासाठी लढा देणारी संघटना म्हणून व्हाईस ऑफ मीडियाची ओळख आहे. या संघटनेच्या साप्ताहिक विभागाच्या चंद्रपूर जिल्हाध्यक्षपदी जितेंद्र जोगड यांची नियुक्ती करण्यात आली.

व्हाईस ऑफ मीडिया संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष संदीप काळे आणि साप्ताहिक विभाग प्रदेशाध्यक्ष विनोद बोरे यांनी या नियुक्तीचे पत्र पाठविले.

जितेंद्र जोगड, हे चंद्रपुर जिल्ह्यातील ज्येष्ठ संपादक असून, मागील २३ वर्षापासून पत्रकारीतेत व १४ वर्षापासून वृतपत्रचे संपादक आहेत. विदर्भ की बात या वर्तमानपत्रात जिल्हा प्रतिनिधि म्हणून काम केले असून, त्यांचे रजिस्ट्रेशन ऑफ न्यूज़पेपर (आरएनआय) यांच्या विविध विषयावर त्यांचे चांगले अभ्यास आहे ते राज्यातील व राज्या बाहेरिल वर्तमानपत्रंना सहकार्य व मार्गदर्शन करतात.

जितेंद्र जोगड हे साप्ताहिक लोक तंत्र की आवाज़ आणि लोकतंत्र की आवाज़ या डिजिटल मीडिया पोर्टलचे संपादक आहेत. या क्षेत्रातील विविध पुरस्काराचे ते मानकरी ठरले आहेत. विविध सामाजिक, धार्मिक, आध्यात्मिक, व्यापारी संघटनांशी ते जुडले असून, व्हाईस ऑफ मीडियाच्या या माध्यमातून वृतपत्रा चे आरएनआय एनुअल रिपोर्ट सबमिट शिबिर आणि आरएनआय चे नवीन नियम यावर प्रशिक्षण मेळावे आयोजित करून चंद्रपुर जिल्ह्यातील साप्ताहिक संपादकांना पत्रकारांना प्रशिक्षित करू, असा विश्वास त्यांनी नियुक्तीप्रसंगी व्यक्त केला आहे.

- जितेंद्र जोगड यांची निवड झाल्याबद्दल, व्हाईस ऑफ मीडियाचे संस्थापक संदीप काळे, प्रदेशाध्यक्ष अनिल म्हस्के, साप्ताहिक विभाग प्रदेशाध्यक्ष विनोद बोरे, विभागीय अध्यक्ष मंगेश खाटीक, जिल्हा अध्यक्ष संजय पडोळे, चंद्रपुर महानगर अध्यक्ष सारंग पांडे, चंद्रपुर महानगर कार्याध्यक्ष जितेंद्र चोरडिया यांचे त्यांनी आभार मानले आहे.
- चंद्रपूर जिल्ह्यातील साप्ताहिक विभाग ची कार्यकारणी लवकरच घोषित करण्यात येणार असून या संघटनेची जुळून कार्य करण्याकरिता ९८२२२२०२७३ वर संपर्क साधण्याचे आवाहन जितेंद्र जोगड यांच्या कडून करण्यात आले आहे.

जुनी पेन्शन हा कर्मचाऱ्यांचा मुलभूत हक्क , तो त्यांना मिळालाच पाहिजे : आ. सुधाकर अडबाले

निळकंठराव शिंदे महाविद्यालयात भव्य सत्कार सोहळा

भद्रावती / प्रतिनिधी
प्रदिर्घ सेवेनंतर कर्मचारी सेवानिवृत्त होतो. त्यांच्या सेवानिवृत्तीनंतरचा काळ सुख, समाधान आणि आनंदाचा गेला पाहीजे. यासाठी सर्व कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू झाली पाहीजे.जुनी पेन्शन हा कर्मचाऱ्यांचा मुलभूत हक्क , तो त्यांना मिळालाच पाहिजे . असे प्रतिपादन नवनिर्वाचित शिक्षक आमदार सुधाकर अडबाले यांनी केले. स्थानिक निळकंठराव शिंदे विज्ञान व कला महाविद्यालयात काल दि. ७ एप्रिल रोजी आयोजित भव्य सत्कार सोहळ्यात उपस्थितांना मार्गदर्शन करतांना आ. सुधाकर अडबाले बोलत होते.

यावप्रसंगी व्यासपिठावर अध्यक्षस्थानी भद्रावती शिक्षण , संस्था भद्रावतीचे अध्यक्ष डॉ. विवेक शिंदे, शिक्षक आमदार तथा सत्कारमूर्ती सुधाकर अडबाले , कार्यक्रमाचे विशेष अतिथी चांदा शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव प्राचार्य डॉ. अशोक जिवतोडे,चंद्रपूर जिल्हा शिक्षण संस्था संचालक मंडळाचे अध्यक्ष डॉ अनिल शिंदे ,भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस सेवादल जिल्हाध्यक्ष सूर्यकांत खनके , भद्रावती शिक्षण संस्था भद्रावतीचे सचिव तथा कार्यक्रमाचे स्वागताध्यक्ष डॉ .कार्तिक शिंदे , भद्रावती शिक्षण संस्था भद्रावतीचे सहसचिव डॉ. विशाल शिंदे , कार्यक्रमाचे निमंत्रक तथा निळकंठराव शिंदे विज्ञान व कला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ . लेमराज लडके आणि यशवंतराव शिंदे विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जयंत वानखेडे उपस्थित होते.

याप्रसंगी विधान परिषदेच्या नागपूर शिक्षक मतदार संघातून सर्वाधिक मताधिक्याने विजयी झाल्याबद्दल नवनिर्वाचित शिक्षक आमदार सुधाकर अडबाले यांचा भद्रावती शिक्षण संस्था भद्रावतीचे अध्यक्ष डॉ. विवेक शिंदे यांच्या शुभ हस्ते शाल, श्रीफळ व सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. तसेच गोंडवाना विद्यापीठ गडचिरोलीच्या अलिकडेच पार पडलेल्या निवडणुकीत विद्यापीठाच्या विविध प्राधिकरणावर निवडून आलेल्या व्यक्तींचा सत्कार करण्यात आला यात सिनेट व्यवस्थापनेतून डॉ. विवेक शिंदे , प्राचार्य गटातून सिनेट व्यवस्थापन परिषदेवर प्राचार्य डॉ. लेमराज लडके , सिनेट शिक्षकांमधून डॉ. नथू वाढवे , प्रा. डॉ प्रवीणकुमार नासरे , प्रा. डॉ. शशिकांत शित्रे , प्रा. डॉ. अजय दहेगावकर , प्रा. डॉ . अपर्णा धोटे , प्रा. डॉ. राजेश हजारे , प्रा. डॉ. गजानन खामनकर , प्रा. डॉ विजय टोंगे , प्रा. डॉ. सुहास तेलंग , प्रा.डॉ. यशवंत धुमे व प्रा. डॉ. उत्तम घोसरे यांचा शाल , श्रीफळ व सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी विशेष अतिथी प्राचार्य डॉ.अशोक जीवतोडे यांनी आपण समाजकारणाला प्राधान्य दिले म्हणून शिक्षण संस्था मोठी झाली सोबतच संस्थेमध्ये काम करणारे कर्मचारी सुद्धा मोठ्या पदापर्यंत पोहोचल्याचा मला अभिमान आहे. असे आपल्या मार्गदर्शनातून स्पष्ट केले .

- कार्यक्रमाच्या अध्यक्षीय भाषणात डॉ. विवेक शिंदे यांनी आपल्याला जीवनात यशाचे सर्वोच्च शिखर गाठावयाचे असेल तर आधी आपले ध्येय निश्चित करा. ते प्राप्त करण्याकरिता योग्य प्रयत्न करा . जोपर्यंत यश मिळत नाही, तोपर्यंत प्रयत्नांची पराकाष्टा करीत रहा . असे सांगितले.तसेच शिक्षण संस्थामुळे शिक्षण हे समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत पोहोचले याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ .कार्तिक शिंदे , संचलन प्रा. डॉ सुधीर मोते तर आभार प्रदर्शन प्राचार्य डॉ .जयंत वानखेडे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता भद्रावती शिक्षण संस्था , भद्रावती अंतर्गत सर्व शाळा , विद्यालय , कनिष्ठ महाविद्यालय व वरिष्ठ महाविद्यालयातील शिक्षक , शिक्षकेतर कर्मचारी यांनी सहकार्य केले.

---

११ संचालक पदासाठी ३३ उमेदवारांचे नामनिर्देशन पत्र दाखल

भद्रावतीच्या मच्छिंद्र मच्छुआ सहकारी संस्थेची निवडणूक

भद्रावती / प्रतिनिधी
स्थानिक मच्छिंद्र मच्छुआ सहकारी संस्थेची निवडणूक येत्या १४ मे रोजी होऊ घातली असून ११ संचालकपदासाठी ३५ उमेदवारांनी आपले नामांकन अर्ज दाखल केले.छाननीत दोन अर्ज बाद होऊन ३३ उमेदवार सध्या निवडणूक रिंगणात आहे. ही निवडणूक सन २०२२ मध्येच पार पडायला पाहिजे होती. परंतु कोरोना काळामुळे ही निवडणूक एक वर्ष पूढे ढकलल्या गेली.

मच्छिंद्र मच्छआ सहकारी संस्थेची मतदार संख्या ४२६ आहे .प्राप्त. नामनिर्देश पत्राच्या तपासणी नंतर इतर मागासवर्गीय प्रवर्गातील २ उमेदवारांनी आपले जातीचे प्रमाणपत्र न जोडल्यामुळे त्यांचे नामनिर्देशपत्र अपात्र ठरविण्यात आली . छाननी नंतर विधी ग्राह्य व नामनिर्देशनपत्राची अंतीम यादी दि. ११ एप्रिल ला सकाळी ११ वाजता निवडणूक निर्णय अधिकारी सहायक निबंध कार्यालय भद्रावती यांच्या कार्यालयात प्रसिद्ध करण्यात येईल.

प्रसिध्द करण्यात आलेल्या उमेदवारांना आपले उमेदवारी अर्ज १० एप्रिल रोजी सकाळी ११ वाजता ते २६ एप्रिल दुपारी ३ वाजेपर्यंत आपले उमेदवारी अर्ज मागे घेता येईल.दि. २६ एप्रिल रोजी ऊमेदवारांची अंतिम यादी प्रसिध्द करुन त्यांना निवडणुक चिन्हांचे वाटप करण्यात येणार आहे. १४ मे रोजी मतदान पार पडेल आणि लगेच मतमोजणी करून निकाल जाहीर करण्यात येईल.

शॉर्टसर्कीट मुळे टिप्पर जळून खाक

चंद्रपूर / प्रतिनिधी
नागभीड ते नागपूर नवीन लोह मार्गाच्या सुरू असलेल्या कामावर नवखळा परिसरातील रेल्वे मार्गावर टिप्पर शार्टसर्कीटमुळे जळून खाक झाला. नागभीड ते नागपूर नवीन लोह मार्गावर मुरूम टाकण्याचे काम सुरू असताना दिनांक १ एप्रिल २०२३ ला दुपारच्या सुमारास अचानक एम.एच.२० इ.जी. ८०६६ या क्रमांकच्या १० चक्का टिप्पर मधील वायरिंग शार्टसर्कीट होऊन टिप्पर ने पेट घेतला.

दरम्यान ड्रायव्हर च्या लक्षात येताच टिप्पर चालकाने टिप्पर थांबवून सहकार्यांना बोलविले सदर सहकार्याने तेथील कामावर वापरात असलेला पाण्याचा टँकर आणून टिप्परची आग विझविण्यात आली. परंतु तोपर्यंत सदर टिप्पर जळून खाक झाला होता. टिप्परची नुकसान ३० ते ३५ लाख रूपयांची नुकसान झाली आहे.

नक्षल प्रभावित दुर्गम भागात संविधान जनजागृतीसाठी सामाजिक कार्यकर्त्यांचा पुढाकार

संविधान उद्देशिका आता आदिम माडिया भाषेत !

चंद्रपूर/ प्रतिनिधी
गडचिरोलीतील नक्षलग्रस्त अतिदुर्गम भामरागड, एटापल्ली, अहेरी, धानोरा व छत्तीसगड सीमावर्ती भागात आदिम माडिया समाज आहे. मागील वर्षी पाथ संस्थेने केलेल्या सर्वेक्षणात ९४ टक्के माडिया समाज बांधवांनी 'संविधान' हा शब्दच ऐकला नसल्याचे धक्कादायक वास्तव पुढे आले होते. ही बाब लक्षात घेता भारतीय संविधान उद्देशिकेचा स्थानिक आदिम माडिया भाषेत भामरागड येथील माडिया समाजातील पहिले वकील ॲड.लालसू नोगोटी, हेमलकसा येथील चिन्ना महाका व चंद्रपूर येथील अविनाश पोईनकर या सामाजिक कार्यकर्त्यांनी अनुवाद केला आहे.

देशात एकूण ७५ आदिम समुदाय आहेत. त्यात महाराष्ट्रात कोलाम, कातकरी आणि माडिया या तीन आदिम जमाती आहे. राज्यातील एकूण ३ आदिम समुदायांपैकी जल, जंगल, जमिनीवर उपजीविका करणारा हा एक समुदाय. शिक्षणाची कमी, जन्मदरापेक्षा मृत्यूदर अधिक या समाजात दिसते. स्वतंत्र बोलीभाषा व संस्कृती या समुदायाची ओळख. स्वातंत्र्याच्या पंच्याहत्तरीनंतरही मुलभूत गरजांचीच पुर्तता अद्याप या परिसरात होवू शकलेली नाही. हक्क आणि अधिकाराची होणारी गळचेपी या समुदायासाठी नित्याचीच बाब झाली आहे.

अशा या भागात भारतीय संविधान त्यांच्याच बोलीभाषेत पोहोचणे गरजेचे आहे. संविधान उद्देशिका म्हणजे संविधानाच्या प्रतीचा सार आहे. त्यामुळे या उद्देशिकेच्या माध्यमातून नक्षल प्रभावित भागात संविधानाबाबत जनजागृती करण्याचा एक सकारात्मक अन् प्रामाणिक प्रयत्न केला जातो आहे. माडिया समाजामध्ये या संविधान उद्देशिकेच्या माध्यमातून संविधानाबाबत जनजागृती निर्माण झाल्यास कालांतराने हक्काबाबत, देशाचे संविधान अवलंबण्याबाबत आमुलाग्र बदल होईल.

संविधान तळागाळात- घराघरांत पोहोचवणे प्रत्येकाची नैतिक जबाबदारी आहे. संविधानाचे पाईक म्हणून या भागात संविधान जनजागृतीचे प्रयत्न गरजेचे आहे. माडिया समाजाला आपल्या मातृभाषेत उद्देशिका कळावी अन् त्यातून जनजागृती करता यावी म्हणून आम्ही हा अनुवाद केला असल्याचे सामाजिक कार्यकर्ते ॲड.लालसू नोगोटी, चिन्ना महाका, अविनाश पोईनकर यांनी सांगितले.

अनुवादाबाबत प्रशासन अनभिज्ञ

- संविधान म्हणजे काय, हे समजावून सांगण्यासाठी गडचिरोली जिल्ह्यासह छत्तीसगडच्या दुर्गम भागामध्ये प्रशासन गेली अनेक दशके प्रयत्न करीत असले तरी आदिम माडिया भाषेतून ते नागरिकांपर्यंत पोहोचले नाही. संविधान उद्देशिकेचा आजवर अनेक भारतीय भाषांमध्ये अनुवाद झाला आहे. मात्र, आदीम अन् त्यातल्या त्यात नक्षल प्रभावित भागातील या माडिया भाषेत संविधान उद्देशिकेचा अनुवाद पहिल्यांदाच झाला असल्याने त्याला एक वेगळे महत्त्व प्राप्त झाले आहे. प्रशासन या अनुवादाबाबत सध्या अनभिज्ञ असले तरी या राष्ट्रीय कार्याची दखल घेवून या दुर्गम परिसरात शाळा, महाविद्यालय, शासकिय-निमशासकिय कार्यालयातून माडिया भाषेतील संविधान उद्देशिका पोहोचवून जनजागर करणे आवश्यक आहे.

श्री हनुमान जन्मोत्सव शोभायात्रेने भद्रावती नगरी दूमदुमली

भद्रावती / प्रतिनिधी
स्थानिक श्री हनुमान जन्मोत्सव समितीच्या वतीने श्री हनुमान मंदिर श्री मंगल कार्यालय समोर इथून दि. ६ एप्रिल रोजी निघालेल्या भव्य शोभायात्रेने भद्रावती नगरी दुमदुमली. याप्रसंगी पुर्व केंद्रिय मंत्री तथा राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाचे अध्यक्ष हंसराज अहिर प्रामुख्याने हजर होते.या शोभायात्रेत शहरातील हजारो नागरिक सहभागी झाले. यावेळी रामायणातील विविध प्रसंग दर्शविणारे दृश्य सादर करण्यात आले.

दि. ५ व ६ एप्रिल रोजी विविध धार्मिक कार्यक्रम घेण्यात आले. दि. ५ एप्रिल रोजी श्री गणेश भजन मंडळ आ. नि.चांदा यांचे जागृती भजन, गुरुवार दि. ६ एप्रिल ला हनुमान मूर्तीचे पूजन डॉ. विवेक शिंदे व डॉ. प्रशांत नागरे यांच्या शुभ हस्ते करण्यात आले. सकाळी दहा वाजता भजन व किर्तन, दुपारी बारा वाजता श्री हनुमान चालीसा व सुंदर कांडाचे वाचन राजस्थानी महिला मंडळ भद्रावती यांचे वतीने करण्यात आले. सायंकाळी साडे पाच वाजता हनुमान मूर्तीचे पूजन, त्यानंतर राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाचे अध्यक्ष तथा पूर्व केंद्रीय मंत्री हंसराज अहिर यांच्या शुभहस्ते शोभायात्रेचे उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी प्रमुख प्रमुख अतिथी म्हणून चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे माजी अध्यक्ष तथा विद्यमान संचालक रवींद्र शिंदे, उपविभागीय पोलिस अधिकारी आयुष नोपाणी, पोलीस निरीक्षक बिपीन इंगळे, नगरपालिकेचे उपाध्यक्ष संतोष आमने, धनोजे कुणबी समाजाचे अध्यक्ष प्रा.धनराज आस्वले ,ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते चंद्रकांत पा. गुंडावार आणि मनीष सारडा प्रामुख्याने उपस्थित होते.ायंकाळी सहा वाजता भव्य शोभा यात्रेचा प्रारंभ करण्यात आला.ही शोभायात्रा श्री हनुमान मंदिर , श्री मंगल कार्यालय ते स्व. बाळासाहेब ठाकरे प्रवेशद्वार पासून बँक ऑफ इंडिया ,जुना बस स्टॉप गांधी चौक , भद्रनाग मंदिर ते गांधी चौक पर्यंत आणून शोभा यात्रेचा समारोप करण्यात आला.

सह्याद्री चा राखणदार साप्ताहिक वृत्तपत्र मालक , प्रकाशक , संपादक आशीष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टिसव्हिसेस कर्मवीर वॉर्ड वरोरा येथून मुद्रित करून मातृछायाभवन कर्मवीर वॉर्ड वरोरा येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही. यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालयाअंतर्गत होईल.

A weekly newspaper `SAHYADRI CHA RAKHANDAR` printed by *Suraj Bhaktraj Ghume* ,sahyandri multiservices, karmveer ward , warora 442907 (M.H) on behalf of Ashish Maroti Ghume owner, publisher & Editor of sahyadri cha rakhandar` matruchaya bhawan` , karmveer ward warora 442907(M.H) . the editer may not be agree with the published content . in case any objection , the content will be redressed under warora court RNI NO : MAHMAR/2018/77866
CONTACT NUMBER :- Ashish Ghume 9011708840, Suraj Ghume 9673560360 EMAIL :- sahyandrinews@gmail.com EPAPER :- epaper.sahyandrinews.com